## 5. प्रकल्पांतर्गत देखभाल व दुरुस्तींच्या कामांची सद्यःस्थिती

पेंच प्रकल्पाची बांधकाम दुरुस्तीची कामे 2701 या लेखाशिर्षाखाली करण्यात येत असुन सिंचनाच्या मिळणाऱ्या पाणीपट्टीच्या व बिगर सिंचनाच्या मिळणाऱ्या महसुलाच्या उपलब्ध होणाऱ्या निधीवर केला जातो. तसेच पाणी वापर संस्था मार्फत सिंचन पाणीपट्टीद्वारे प्राप्त रक्कमेच्या ५० टक्के परतावा पाणी वापर संस्थाना देण्यात येतो. सदर निधीचा वापर पाणी वापर संस्थांच्या अंतर्गत लाभक्षेत्राच्या पाटचाऱ्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येतो.

पेंच प्रकल्पांतर्गत बांधकाम दुरुस्तीची कामांसाठी सन 2021-22 करीता रु.**2013.75** लक्ष किंमतीची प्रापण सुची मंजुरीकरीता सादर करण्यात आली असुन त्या अंतर्गत चालु कामांचे दायित्व रु.**204.68** लक्ष, प्रस्तावित कामांकरीता रु. **1702.76** लक्ष व निविदाबाह्य कामांसाठी रु. **106.31** लक्ष ची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. उपरोक्त 2701 लेखाशिर्षावर देखभाल दुरुस्तीच्या कामावर मागील पाच वर्षात केलेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अनु.क्र. | वर्ष | खर्च (कोटी) |
|---|---|---|
| १ | 2016-17 | 1.09 |
| 2 | 2017-18 | 5.49 |
| 3 | 2018-19 | 5.07 |
| 4 | 2019-20 | 8.00 |
| 5 | 2020-21 | 8.22 |
| ६ | 202१-2२ | 3.92 (सप्टेंबर अखेर) |